मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# हिंदुंच्या सुरक्षेसाठी पिंपरीत जनगर्जना मोर्चा

**बांगलादेशात हिंदूंवर ,हिंदू मंदिरांवर होणा-या हल्ल्यांचा निषेध : हिंदूंच्या सुरक्षिततेच्या प्रमुख मागणीसाठी मोर्चा काढण्यात आला.**

**पिंपरी | प्रतिनिधी**

बांगलादेशात हिंदूंवर तसेच हिंदू मंदिरांवर होणा-या हल्ल्यांच्या निषेधार्थ व तेथील हिंदूंच्या सुरक्षिततेच्या प्रमुख मागणीसाठी सकल हिंदू समाजातर्फे शहरात हिंदू जनगर्जना मोर्चा काढण्यात आला. आज रविवारी (दि. १८) सकाळी चिंचवड येथील क्रांतिगुरू लहुजी वस्ताद साळवे पुतळा चौक ते पिंपरीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा चौकापर्यंत मोर्चा काढण्यात आला.

यावेळी मोर्चेकऱ्यांनी विविध मागण्या केल्या. बांगलादेशामध्ये हिंसक आंदोलनातून सत्तांतर झाले आणि तेथील हिंदू, जैन, बौद्ध अल्पसंख्य समाज विनाकारण भरडला गेला. हिंदू, जैन, बौद्धांवर अमानुष हल्ले, अत्याचार, क्रूर हत्या होत आहेत.

हे थांबविण्यासाठी केंद्र सरकारने हस्तक्षेप करावा. सीएए कायद्यानुसार बांगलादेशामधून आलेल्या हिंदू, जैन, बौद्धांना भारतीय नागरिकता देण्याची प्रक्रिया जलद गतीने करावी.

पुणे जिल्ह्यात किती रोहिंग्या मुसलमान घुसखोर, बांगलादेशी मुसलमान घुसखोर वास्तव्यास आहेत, याचे सर्वेक्षण तातडीने करावे. त्यांच्यामुळे भारताच्या सुरक्षेला गंभीर धोका उत्पन्न होऊ शकतो.

त्यांच्यामुळे भारतीय तरुणांचा रोजगार हिरावला जात आहे. भारतीय संस्कृतीला त्यांच्यामुळे धोका उत्पन्न झाला आहे. बांगलादेशी मुसलमान घुसखोर आणि रोहिंग्या मुसलमान घुसखोर शोधून त्यांचे स्थलांतर करावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली.



### दुकानदार, व्यावसायिक यांचे मोर्च्याला उत्स्फूर्त समर्थन !

» दुकानदार, व्यावसायिकही मोर्च्याला उत्स्फूर्त समर्थन देत होते. हा मोर्चा शहरातील मुख्य मार्गाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, पिंपरी येथे पोचला. तिथे विश्व हिंदु परिषद केंद्रीय सहमंत्री शंकर गायकर यांनी मोर्चाच्या प्रमुख मागण्या संबंधी माहिती देऊन बांगलादेशातील हिंदूंवर होत असलेल्या अत्याचारांवर उपस्थितांचे लक्ष वेधले आणि त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तातडीच्या उपाययोजना करण्याची आग्रही मागणी केली

### अतिशय शिस्तबद्ध आणि भव्य मोर्चा

» मोर्चा अतिशय शिस्तबद्ध पद्धतीने मार्गक्रमण करत होता, दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस अधीक्षकांनी मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. समारोपस्थानी पिंपरी चौकातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून वंदन करण्यात आले.

### प्रशासनाला निवेदनाद्वारे आवाहन !

» पुण्यातील कायदेतज्ञ अधिवक्त्या वर्षा डहाळे यांनी बांगलादेश येथील महिलांवर होत असलेले अत्याचार कथन करून सर्वच इस्लामी राजवटीत महिला दुर्लक्षित राहिल्या, त्यांच्यावर अत्याचार होत आहेत, ही अत्यंत दुःखाची आणि संताप आणणारी गोष्ट आहे, असे नमूद केले. त्यानंतर मोर्च्यात सहभागी झालेल्या महिला आणि सकल हिंदु समाज समन्वय समितीने प्रशासनाला निवेदनाद्वारे आवाहन केले.


# पुरेशा वाहन तळांअभावी आकुर्डीतील पदपथांवर वाहनांचे अतिक्रमण!

**उद्योगनगरीमध्ये वाहनांची संख्या खूप जास्त प्रमाणात वाढली आहे. त्याचबरोबरीने वाहनतळांची कमतरता जास्त दिसून येत आहे**

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुरेशा वाहन तळांअभावी आकुर्डी परिसरात रस्त्यांवर आणि पदपथांवर बेकायदेशीरपणे वाहने उभी केली जात आहेत. त्यामध्ये, दुचाकीपासून मोटारी, ट्रक, ट्रॅव्हल्स, बसेस यांचे जास्त प्रमाण आहे. याशिवाय, बेवारस वाहनांचीही समस्या प्रकर्षाने दिसून येत आहे. त्याचा पादचारी आणि रहदारीला अडथळा होत आहे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला स्मार्ट सिटी, . परंतु, उद्योगनगरीमध्ये वाहनांची संख्या खूप जास्त प्रमाणात वाढली आहे. त्याचबरोबरीने वाहनतळांची कमतरता जास्त दिसून येत आहे. आकुर्डीमधील बिजलीनगर परिसरात ठिकठिकाणी वाहने बेकायदेशीरपणे उभी केली असतात. स्पाईन रोड, बिजलीनगर रस्ता, आकुर्डी रेल्वे स्थानकासमोर निगडीकडे जाणाऱ्या रस्त्यावर, गुरूद्वारा या ठिकाणी बेकायदेशीरपणे वाहने उभी केलेली हमखास दिसून येतात. आकुर्डी रेल्वे स्थानकाबाहेर निगडीकडे जाणाऱ्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला वाहने उभी केली जात असून पीएमपीच्या बस किंवा बाकी वाहनांनाही हा त्रास सहन करावा लागत आहे.



### पदपथावर अतिक्रमण

» गुरूद्वारा परिसरात व्यावसायिकांचे जास्त प्रमाण आहे. त्यामुळे, वाहने उभी करण्यासाठी रस्ते अपुरे पडत आहेत. त्यामुळे, पदपथावर वाहने सर्रास उभी केली जात आहेत. तर पादचाऱ्यांना धोकादायकपणे मुख्य रस्त्याने प्रवास करावा लागत आहे.

### बेवारस वाहनांची समस्या

» स्पाईन रोडच्या बाजूच्या सेवा रस्त्याला काही ठिकाणी जुनी आणि बेवारस वाहने पडून आहेत. विनावापरातील वाहने नागरिक रस्त्यावर येऊन लावत आहेत. त्यांच्या आजूबाजूला गवत, चिखल झाला आहे आणि त्याच ठिकाणी कचरा आणून टाकण्यात येत आहे.

# पावसाने पुन्हा पुण्याची कोंडी, वाहनांच्या जागोजागी रांगा

## सलग दुसऱ्या दिवशी पावसाची दमदार हजेरी, पावसाने रस्त्यांना आले ओढ्या, नाल्याचे स्वरुप

**पुणे | प्रतिनिधी**

बऱ्यापैकी विश्रांती घेतलेल्या पावसाने शनिवारी हजेरी लावल्यावर सलग दुसऱ्या दिवशी दमदार बॅटिंग केली. रविवारी दुपारपर्यंत ऊन पडले होते, उकाडाही जाणवत होता. पाचनंतर वाऱ्यासहित जोरदार पावसाने हजेरी लावली. तासाभराच्या पावसामुळे रस्त्यांना ओढ्या, नाल्याचे स्वरूप आले.

सोमवारचे रक्षाबंधन आणि रविवारची सुटी असल्याने खरेदीसाठी बाहेर पडलेल्या पुणेकरांची त्रेधातिरपीट उडाली. एवढेच नव्हे तर रस्त्यावर साचलेल्या पाण्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. पावसाने आणि वाहनांच्या कोंडीने पुणेकर चांगलेच हैराण झाले. वडगाव शेरीत सर्वाधिक १०१.५ मिलिमीटर पाऊस झाल्याने रस्त्यावर गुडघाभर पाणी साचले होते.

शहरात पावसाने गेल्या काही दिवसांपासून विश्रांती घेतली होती. मात्र, शनिवारपासून पावसाने हजेरी लावत शहराला चांगले झोडपले. शनिवारी रात्री पाऊस पडल्यानंतर रविवारी दुपारपर्यंत ऊन पडले होते. मात्र उकाडा जाणवत होता. दुपारी ५ नंतर अचानक वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाने हजेरी लावली. तासाभराच्या पावसामुळे रस्त्यांना नदीचे स्वरूप आले. यामुळे महापालिकेने केलेल्या कामांवर नागरिकांनी पुन्हा प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

शनिवारच्या पावसानंतर रविवारी पाऊस पडेल असे कोणतेही वातावरण नव्हते. त्यामुळे नागरिक बिनधास्तपणे बाहेर पडले. एका तासाच्या पावसाने त्यांची चांगली दाणादाण उडाली. शहराच्या अनेक ठिकाणी पाणीच पाणी साचल्याने वाहतूक कोंडी झाली होती. अनेक भागात गुडघाभर पाणी साचल्याने वाहने रस्त्यात मध्येच बंद पडली होती.



### पालिकेच्या कामावर प्रश्नचिन्ह

» शहरात पावसाने हजेरी लावताच पुणेकरांच्या मनामध्ये धडकी भरते. एका तासात झालेल्या पावसात रस्त्यांना नदीचे स्वरूप प्राप्त होते. अनेक भागातील ड्रेनेज लाईन तसेच पावसाळी लाईन तुंबल्याने रस्त्यावर गुडघाभर पाणी साचते. यामुळे महापालिकेने केलेल्या कामावर संशय व्यक्त होत आहे. शहरातील रस्त्यांवर पाणी साचणार नाही, पूरजन्य परिस्थिती निर्माण होणार नाही, असा दावा महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने केला होता. एका तासाच्या पावसाने हा दावा फोल ठरल्याचा आरोप पुणेकर करत आहेत

### जोरदार ते मध्यम पावसाचा अंदाज

» हवामान विभागाने पुढील तीन दिवस राज्याच्या विविध भागात जोरदार ते मध्यम पावसाचा अंदाज व्यक्त केला आहे. विदर्भातील बुलढाणा, अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशिम, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात रविवारी (दि. १८) काही ठिकाणी जोरदार पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, परभणी आणि हिंगोली तसेच मध्य महाराष्ट्रातील पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, नगर आणि नाशिक जिल्ह्यातही यलो अलर्ट जारी केला आहे.

### पुण्यात यलो अलर्ट

» पुण्यात गेल्या आठवड्यापासूनच उष्णता जाणवत आहे. त्यामुळे उन्हाचे चटके सहन करावे लागले. शनिवारी दिवसभर उकाड्याने पुणेकर चांगलेच हैराण झाले होते. शनिवारी सायंकाळी आकाशात ढगांची गर्दी झाली आणि जोरदार सरी कोसळल्या. पुढील दोन-तीन दिवस पुण्यासाठी यलो अलर्ट जारी केला आहे. पुणे शहरात १८-२१ तारखेपासून पावसात वाढ होण्याची शक्यता आहे

# मंकीपॉक्स वेशीवर! राज्याचा आरोग्य विभाग केंद्राच्या निरोपाच्या प्रतीक्षेत

## आफ्रिकेतील विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे, जगभरात मंकीपॉक्सचा वेगाने प्रसार होऊ लागला आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

जगभरात मंकीपॉक्सचा वेगाने प्रसार होऊ लागला आहे. आफ्रिकेतील देशांसह पाकिस्तानमध्येही हा संसर्ग पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून उच्चस्तरीय बैठकांचे सत्र सुरू आहे. देशात अनेक राज्यांत आफ्रिकेतील विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. यामुळे काही राज्यांनी आपापल्या आरोग्य यंत्रणांना अतिदक्षतेचे आदेश दिले आहेत. महाराष्ट्राने मात्र केंद्राकडून मार्गदर्शक सूचना नसल्याने त्या काढता येत नसल्याचे तांत्रिक कारण समोर केले आहे.

जगभरात मंकीपॉक्सचा संसर्ग वाढला आहे. जागतिक आरोग्य संघटनेने १४ ऑगस्टला हे चिंताजनक आरोग्य संकट म्हणून जाहीर केले. मंकीपॉक्सच्या रुग्णांची संख्या आफ्रिकेतील देशांमध्ये वाढत आहे. त्याच वेळी पाकिस्तानमध्येही या रोगाचा शिरकाव झाला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी शनिवारी (१७ ऑगस्ट) उच्चस्तरीय बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी उपाययोजना करण्याचे निर्देश राज्यांना दिले. याचबरोबर भारतात एकही रुग्ण आढळला नसल्याने घाबरून जाऊ नये, असे आवाहन केले. त्यानंतर राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राच्या संचालकांनी सर्व राज्यांच्या आरोग्य विभागांची बैठक रविवारी (ता.१८) घेतली. यात त्यांनी राज्यांना उपाययोजनांचे निर्देश दिले.

विशेष म्हणजे केंद्रीय आरोग्य मंत्रालयाकडून बैठकांचा धडाका सुरू असताना अद्याप मंकीपॉक्सबाबत नवीन मार्गदर्शक सूचना जाहीर झालेल्या नाहीत.




### पुण्याला धोका अधिक

» पुण्यात परदेशी विद्यार्थी शिक्षणासाठी येण्याचे प्रमाण जास्त आहे. त्यातही आफ्रिकी देशांतील विद्यार्थ्यांची संख्या अधिक आहे. परदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे या शहरांत मंकीपॉक्सचा संसर्ग होण्याचा धोका आहे. केंद्र आणि राज्य सरकारच्या मार्गदर्शक सूचना नसल्यामुळे स्थानिक आरोग्य यंत्रणा कोणतीही पावले सध्या याबाबत उचलताना दिसत नाहीत. याच्या उलट तमिळनाडू राज्य सरकार आणि दिल्ली व हैदराबाद शहरातील स्थानिक प्रशासनांनी याबाबत मार्गदर्शक सूचना जारी करून आतापासूनच मंकीपॉक्सचा संसर्ग रोखण्याची पावले उचलली आहेत.

> “ मंकीपॉक्सच्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी राष्ट्रीय रोग नियंत्रण केंद्राच्या संचालकांनी बैठक घेतली. यात त्यांनी उपाययोजनांचे निर्देश दिले आहेत. देशात अद्याप एकही रुग्ण आढळून आलेला नाही, त्यामुळे घाबरून जाण्याची आवश्यकता नाही. केंद्र सरकारने मंकीपॉक्सबाबत नव्याने मार्गदर्शक सूचना काढल्यानंतर राज्याच्या आरोग्य विभागाकडून त्या काढल्या जातील.
>
> \- डॉ. राधाकिशन पवार, सहसंचालक, आरोग्य विभाग

# 'दिसली मोकळी जागा की मार ताबा'

## टोळीमुळे इंद्रायणीनगरचे रहिवासी दहशतीखाली : इंद्रायणी नगर येथील बैठकीत अजित गव्हाणे यांच्याकडे नागरिकांनी मांडल्या व्यथा

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड नवनगर प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली सुसज्ज, आणि ‘वेल प्लांड’ नियोजनानुसार स्थापित झालेल्या इंद्रायणीनगरमध्ये आम्ही शांतता, सुनियोजित भाग, चांगल्या सुविधांमुळे घरे बांधली, फ्लॅट घेतले. मात्र आज आम्ही प्रचंड दहशतीखाली आहोत. आमच्या सोसायटीच्या, घराबाहेरच्या मोकळ्या जागा मनमानी पद्धतीने बळकवल्या जात आहेत. फुटपाथवरच्या टपऱ्या, पथारी व्यावसायिकांसाठी गेल्या दहा वर्षात हॉकर्स झोनचे नियोजन न केल्यामुळे इंद्रायणीनगरला अक्षरशः बकालपणा आणला आहे. चौक गुदमरतोय, गुन्हेगारी वाढतेय, महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा ऐरणीवर आला असल्याची कैफियत रविवारी (दि.१८) स्थायी समितीचे माजी अध्यक्ष अजित गव्हाणे यांच्यासमोर नागरिकांनी मांडली.





इंद्रायणीनगर स्पाईन रोड लगतच्या पर्ल बँक्वेट हॉलमध्ये रविवारी(दि.१८) बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला माजी नगरसेवक संजय वाबळे, विक्रांत लांडे, माणिक जैद, पांडुरंग सांडभोर, इम्रान शेख, संजय उदावंत, निवृत्ती शिंदे, सुदाम शिंदे, विजयकुमार पिरंगुटे,पांडुरंग सांडभोर ,श्रीकृष्ण म्हेत्रे, अशोक मोरे तसेच इंद्रायणी नगर भागातील ज्येष्ठ नागरिक,युवा कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी नागरिकांनी बैठकीमध्ये अजित गव्हाणे यांच्याकडे इंद्रायणीनगर मधील अनेक समस्यांकडे लक्ष वेधले. इंद्रायणीनगरमध्ये बकालपणा वाढत आहे. टपऱ्यांचे साम्राज्य वाढले असून, संतनगर, स्पाईन सिटी, सारा स्वीट, इंद्रायणी स्वीट, राकेश स्वीट यांसारख्या चौकांना तर अतिक्रमणांनी अक्षरश: वेढले आहे. गेल्या दहा वर्षात इंद्रायणीनगर भागात छोट्या व्यवसायिकांसाठी जाणीवपूर्वक हॉकर्स झोनचे कोणतेही नियोजन केले नाही. यातून जोरदार हप्तेवसूली, गुन्हेगारीचे उदात्तीकरन होत असून, छोटे व्यावसायिक अतिशय त्रस्त आहेत. महिलांच्या संरक्षणाचा मुद्दा यातून ऐरणीवर आला आहे. चौकांचा श्वास गुदमरत आहे. यातून अशांतता वाढली असून नागरिक हैराण आहेत. येथील प्राधिकरणाच्या मोकळ्या जागा ताब्यात घेऊन त्यावर शेड मारले जातात. त्यातून बिनबोभाट भाडे वसुली सुरू आहे. हे सर्व कोणाच्या आशीर्वादाने सुरू आहे ? आमच्या सोसायटीच्या, घराबाहेरच्या मोकळ्या जागा कधी गिळंकृत केल्या जातील, त्यावर ताबा मारला जाईल अशी आम्हाला भीती वाटते असे देखील बैठकीत सांगण्यात आले. ही परिस्थिती आम्हाला बदलायची आहे. दहा वर्षांपूर्वी सारखे इंद्रायणीनगर आम्हाला हवे आहे. त्यामुळे आम्हाला आता परिवर्तनाची गरज आहे असे देखील नागरिक म्हणाले.

### नागरिक काय म्हणाले?

» नागरिकांनी या बैठकीत महत्त्वाचे मुद्दे मांडले. इंद्रायणीनगर मध्ये राहण्याचे मुख्य कारण म्हणजे या ठिकाणी असलेली शांतता, मोठे रस्ते, चांगल्या सुविधा हे होते. मात्र आता हेही शांतता लोप पावली आहे. फुटपाथ वरून चालता येत नाही अशी परिस्थिती आहे. इंद्रायणी नगरच्या मुख्य चौकातील फूटपाथ अक्षरशः गिळंकृत करण्यात आले आहेत. यावर हातगाडी, टपऱ्या, पथारी व्यावसायिकांनी अतिक्रमण केले आहे. टपरी, पथारी व्यवसायिकांसाठी स्वतंत्र हॉकर्स झोन उपलब्ध करून द्यावे. यासाठी आपण पुढाकार घ्यावा अशी मागणी नागरिकांनी अजित गव्हाणे यांच्याकडे केली.

### ओमनगरीच्या मोकळ्या जागेचे राजकारण कोणी केले?

इंद्रायणीनगर येथील ओमनगरी शेजारच्या मोकळ्या जागेमध्ये दत्त मंदिर असताना भोसरी मतदार संघातील आमदारांच्या बगलबच्चांनी धाकधपटशाचा अवलंब करत येथे पाण्याच्या टाकीचे काम सुरू केले. येथील नागरिकांची संमती घेतली नाही. ओम नगरीतील नागरिकांनी एकी दाखवली आणि उच्च न्यायालयाचे दरवाजे ठोठावले. त्यानंतर पाण्याच्या टाकीचे काम सध्या तरी बंद आहे. पाण्याच्या टाकीला विरोध नाही मात्र दुसरीकडे पाण्याची टाकी होत असतानाही जाणीवपूर्वक राजकारण केले गेले. ही मोकळी जागा मुलांना खेळण्यासाठी, जेष्ठ नागरिकांच्या विविध कार्यक्रमांसाठी असताना पाण्याची टाकी बांधण्याचा उद्योग कोणाच्या आशीर्वादाने केला? टाकीच्या कामासाठी खड्डा खोदण्यात आला. आता तिथे पावसाचे पाणी साचले आहे. गवत वाढले. यामुळे डासांचा प्रादुर्भाव वाढून नागरिकांना डेंग्यू, चिकनगुनिया सारख्या आजारांचा सामना करावा लागत आहे. पाण्याच्या टाकीचे आरक्षण नसताना जाणीवपूर्वक हा खटाटोप केवळ राजकारणासाठी करण्यात आला. याचा नाहक त्रास आम्हाला सहन करावा लागत आहे असे देखील नागरिकांनी यावेळी सांगितले.

# भोसरी मतदार संघात 50 हजाराहून अधिक ‘लाडकी बहीण’ लाभार्थी

## ‘महायुती’ सरकारच्या योजनेला महिलांचा वाढता प्रतिसाद : महापालिकासह सर्व शासकीय विभागांची शहरात लगबग

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यातील महायुती सरकारने ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजना घोषित केली. या योजनेला पिंपरी-चिंचवडमध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. भोसरी विधानसभा मतदार संघामध्ये तब्बल ५० हजाराहून अधिक महिलांनी या योजनेचा लाभ घेतला आहे.

पुण्यातील छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा नगरी येथे राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ, महिला व बाल कल्याण विकास मंत्री आदिती तटकरे यांच्या उपस्थितीमध्ये “वचनपूर्ती” सोहळा संपन्न झाला.




त्यापूर्वीच, लाभार्थी महिलांच्या खात्यावर पैसे जमा झाले आहेत.

आतापर्यंत राज्यात १ कोटी ८ लाख महिलांना या योजनेचा लाभ झाला असून, १ कोटी ३५ लाख महिलांनी या योजनेसाठी नोंदणी केली आहे. महिलांना योजनेचे अर्ज भरण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत मुदत आहे. अर्ज भरल्यानंतर त्यांना जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याची एकत्रित रक्कम त्यांच्या बँक खात्यावर जमा करण्यात येणार आहे.

दरम्यान, पिंपरी-चिंचवडमधील महिलांनी या योजनेला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.गेल्या महिनाभरामध्ये तब्बल १ लाख ६० हजाराहून अधिक महिलांनी योजनेसाठी अर्ज केले आहेत. दि. १६ ऑगस्ट २०२४ पर्यंत शहरातून १ लाख ५० हजार ७३५ इतके अर्ज पात्र ठरले आहेत. या लाभार्थींच्या खात्यावर पैसे जमा झाल्यामुळे महिला वर्गात समाधान व्यक्त होत आहे.

> “ ‘शेवटच्या घटकाचा विकास’ अर्थात अंत्योदय हा भारतीय जनता पार्टी व महायुतीचा अजेंडा आहे. राज्यातील महायुती सरकारने ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना’ घोषीत केली. त्यावेळी यावर टिका झाली. पण, आजच्या घडीला राज्यात सुमारे १ कोटी ३५ लाख आणि शहरात १ लाख ५० हजाराहून अधिक महिलांनी या योजनेचा लाभ घेतला. भोसरी विधानसभा क्षेत्रामध्ये हा आकडा ५० हजाराहून अधिक आहे. राज्यात महिला भगिनींसाठी ‘मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजने’च्या माध्यमातून वर्षाला ३ गॅस सिलेंडर मोफत देण्याचा निर्णय घेतला आहे. जनतेची सेवा हेच शासनाचे ध्येय असून, प्रत्येक योजना याद्दष्टीनेच गतीने राबविण्यात येत आहे, ही बाब निश्चित स्वागतार्ह आहे.
>
> – महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.

# येरवडा मेट्रो स्थानकाला उद्घाटनाची प्रतीक्षा

## महामेट्रोला पाहिजे पंतप्रधान कार्यालयाचा ग्रीन सिग्नल : हजारो नागरिक सुविधेपासून वंचित

**पुणे | प्रतिनिधी**

वनाझ ते रामवाडी या मेट्रो मार्गावरील येरवडा या एकमेव मेट्रो स्थानकाचे काम अपूर्ण होते. त्यामुळे हे स्थानक गेल्या सहा महिन्यांपासून बंद होते. येरवडा मेट्रो स्थानकाचे काम पूर्ण होऊन आता पंधरा दिवस झाले आहेत. असे असले तरी महामेट्रोला आता पंतप्रधान कार्यालयाच्या ग्रीन सिग्नलची प्रतीक्षा आहे. वनाझ ते रामवाडी मार्गावरील हे एकमेव स्थानक सुरू करण्याबाबत महामेट्रो संभ्रमावस्थेत असल्याचे दिसून येते. यामुळे येरवडा व परिसरातील हजारो प्रवासी मेट्रोच्या सुविधेपासून वंचित राहिले आहेत.




येरवडा येथील महामेट्रोच्या स्थानकाचे काम पूर्ण होऊन पंधरा दिवस झाले आहेत. महामेट्रोने सुरुवातीला येरवडा मेट्रो स्थानक जुलै अखेर सुरू होणार असल्याचे सांगितले होते. त्यानंतर १५ ऑगस्टला स्थानक सुरू होईल, अशी अपेक्षा होती. मात्र, महामेट्रोला पंतप्रधान कार्यालयाच्या परवानगीची प्रतीक्षा आहे. महामेट्रो एका बाजूला मेट्रोची प्रवासी संख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करीत आहे. येरवडा मेट्रो स्थानक सुरू झाल्यास मेट्रोच्या दैनंदिन प्रवासी संख्येत मोठी वाढ होण्याची शक्यता असतानाही येरवडा मेट्रो स्थानक सुरू करण्याच्या हालचाली सुरू असल्याचे दिसून येत नाही. येरवडा परिसरातील महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, शास्त्रीनगर सरकारी वसाहत, फुलेनगर, प्रतीकनगर अशा परिसरातून 'पीएमपीएल' बसची फिडर सेवा मिळाल्यास येथील विद्यार्थी, नोकरदार, कष्टकरी वर्गाला मेट्रो सुविधेचा मोठा फायदा होणार आहे.

महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनकडून (महामेट्रो) येरवडा मेट्रोस्थानकाचा जिना राष्ट्रीय क्रीडा मार्गाच्या मधोमध बांधला जात होता. त्यामुळे येरवडा बसथांब्याच्या ठिकाणी वाहनांची कोंडी होत होती. विशेष म्हणजे महापालिकेने परवानगी दिली नसतानाही मेट्रोने जिना उभारल्याचे समोर आले होते. जिन्याचे बांधकाम काढून घेईपर्यंत मेट्रोचे काम सुरू करू देणार नसल्याची भूमिका स्थानिक रहिवाशांनी घेतली होती. त्यामुळे महामेट्रोने येरवडा मेट्रो स्थानकाचे आणि जिन्याचे काम सहा महिने बंद ठेवले होते.

वनाझ ते रामवाडीच्या तिसऱ्या टप्प्यातील मेट्रो मार्ग सुरू करण्याची घाई असल्यामुळे तब्बल सहा महिने (ऑक्टोबर २०२३ ते मार्च २०२४) येरवड्याच्या स्थानकाकडे दुर्लक्ष केले गेले होते. यावर्षी मार्च महिन्यात रुबी हॉल ते रामवाडी या तिसऱ्या टप्प्यातील मेट्रोचे दृकश्राव्याच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्घाटन केले. यावेळी येरवडा मेट्रो स्थानक एप्रिल महिन्यात सुरू होणार असल्याचे महामेट्रोने सांगितले होते. त्यानंतर तारीख पे तारीख देत गेले. आता येरवडा मेट्रो स्थानकाचे काम जुलैमध्येच पूर्ण झाले आहे. असे असतानाही महामेट्रो हे स्थानक सुरू करण्यासाठी पंतप्रधान कार्यालयातून हिरवा कंदिल कधी मिळेल याच्या प्रतीक्षेत आहे. येरवडा मेट्रो स्टेशन सुरू झाल्यानंतर या ठिकाणावरून प्रवासी संख्या वाढणार आहे. येरवडा परिसरातून दैनंदिन प्रवासी संख्या पंचवीस ते तीस हजाराने वाढणार असल्याचा अंदाज आहे. सध्या मेट्रोची प्रवासी संख्या एक लाखाच्या पुढे गेली असून येरवडा मेट्रो स्थानक सुरू झाल्यास ती सव्वा लाखांपर्यंत वाढू शकते असा अंदाज आहे. त्यासाठी आणि नागरिकांच्या सोयीसाठी येरवडा मेट्रो स्थानक लवकर सुरू होणे आवश्यक आहे. या सदंर्भात महामेट्रोशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

### प्रवासी संख्या वाढणार

» येरवडा व परिसराची लोकसंख्या दीड ते दोन लाख आहे. त्यामुळे येरवडा मेट्रो स्थानक सुरू झाल्यास येथील कष्टकरी, मध्यमवर्गीय, विद्यार्थी, चाकरमानी, खासगी नोकरदारांना मेट्रोमुळे पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये सहजपणे जाता येणार आहे. आता मेट्रोची प्रवासी संख्या नव्वद हजारांवर गेली आहे. आता येरवडा मेट्रोस्थानक सुरू झाल्यास ही प्रवासी संख्या सव्वा ते दीड लाखापर्यंत जाऊ शकते, असा अंदाज आहे.

# कृषि विभागातील 258 पदांच्या भरतीसाठी स्पर्धा परीक्षार्थी आक्रमक

## लाडकी बहीण म्हणून आम्हाला सरकारकडून पैसे नकोत : आम्हाला आमच्या पायावर उभे राहायचे आहे

**पुणे | प्रतिनिधी**

कृषि विभागातील राजपत्रित अधिकारी गट अ आणि गट ब मधील मंजूर २५८ पदांचा, रिक्त असलेल्या अन्य १ हजार १८ पदांचा समावेश महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) २५ ऑगस्ट रोजी घेण्यात येणाऱ्या राज्यसेवा परीक्षेत करण्याची मागणी स्पर्धा परीक्षार्थ्यांकडून करण्यात आली आहे. या संदर्भात तातडीने कार्यवाही न झाल्यास स्पर्धा परीक्षार्थी राज्यव्यापी आंदोलनाच्या पावित्र्यात आहेत.



अरविंद कायंदे, संग्राम नरळे, आकाश माने, रोहिणी भाकरे, श्रेया नांगरे, विराज दंडवते, प्रवीण पाटील यांनी पत्रकार परिषदेत या बाबत माहिती दिली. कृषी विभागात १ हजारपेक्षा जास्त जागा रिक्त आहेत. प्रत्येक अधिकाऱ्याकडे दोन-तीन पदांची जबाबदारी आहेत. २०२१च्या २०३ आणि २०२२च्या २१४ जागांसाठी झालेल्या भरती प्रक्रियेत निवड झालेल्या उमेदवारांना अद्याप नियुक्ती मिळालेली नाही. कृषि विभागाने २५८ जागांचे मागणीपत्र एमपीएससीला देऊनही एमपीएससीने जागांची जाहिरात प्रसिद्ध केलेली नाही. या २५८ जागांची जाहिरात प्रसिद्ध करून त्यांचा समावेश २५ ऑगस्टला होणाऱ्या राज्यसेवा परीक्षेत करावा. अन्यथा राज्यभर आंदोलन करण्यात येईल. याबाबत दोनवेळा मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन मागण्या मांडल्या असता त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. पण अद्याप काहीच स्पष्टता नाही, असे कायंदे यांनी सांगितले.

लाडकी बहीण म्हणून आम्हाला सरकारकडून पैसे नकोत. आम्हाला आमच्या पायावर उभे राहायचे आहे. सरकारने कृषि विभागातील हक्काच्या जागा उपलब्ध करून द्याव्यात. तातडीने प्रक्रिया न झाल्यास अनेक उमेदवार वयाधिक होणार आहेत. तसेच अनेक मुलींचे विवाह आणि पुढील आयुष्य थांबले आहे, असे श्रेया नांगरे, रोहिणी भाकरे म्हणाल्या.

दरम्यान, महाराष्ट्र कृषी सेवा गट-अ, गट-ब व गट-ब (कनिष्ठ सेवा) अशी एकूण २५८ पदे सरळसेवा भरतीने भरण्यासाठी कृषि विभागामार्फत महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला पत्राद्वारे कळवण्यात आले आहे, अशी माहिती कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी समाजमाध्यमाद्वारे दिली.

कृषि विभागाच्या २५८ जागांसंदर्भातील मागणीपत्र १६ ऑगस्ट रोजी सायंकाळी एमपीएससीला प्राप्त झाले आहे. आता आयोगात निर्णय घेऊन पुढील प्रक्रिया करण्यात येईल, असे एमपीएससीच्या सचिव डॉ. सुवर्णा खरात यांनी सांगितले.

### स्पर्धा परीक्षार्थीही 'व्होट बँक'

» सरकार व्होट बँककडे पाहात असल्यास स्पर्धा परीक्षार्थी ही देखील व्होट बँक आहे. किमान दीड लाख स्पर्धा परीक्षार्थी २५८ जागांच्या परीक्षेची तयारी करत आहेत त्यामुळे या जागांची राज्यसेवेद्वारे भरती न झाल्यास दीड लाख स्पर्धा परीक्षार्थी आणि त्यांचे कुटुंबीय असे किमान दहा लाख मतदार आगामी निवडणुकीत मताची ताकद दाखवून देणार असल्याचा इशाराही देण्यात आला.